वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार- सोमवार दि.२७ ऑक्टोबर २०२५ पाने ४ किंमत ३

# आता भडकावू भाषणासाठी येऊनच दाखव, गाठ माझ्याशी

## खा. सुप्रिया सुळेंचे आमदार जगतापांना थेट आव्हान

Email:- dailydivyawarta@Gmail.com

दिव्य वार्ता

Email:-editordivyawarta@gmail.com

### मी आडवी उभी राहणार

'यांचं काय कर्तृत्व आहे, हे आमच्या मतदारसंघात येऊन भाषण करणार. माझ्या मतदारसंघात येऊन, अशी भडकावू भाषणे केली ना, गाठ माझ्याशी आहे. माझं मतदारसंघ जिथे सुरू होतो ना, आता त्याच ठिकाणीच मी आडवी उभी राहणार आहे. बघतोस कसा येतो ते, नही चलेगा ये सब,' असा इशारा सुप्रिया सुळे यांनी दिला.



**मुंबई , (दिव्य न्युज):- राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्या तथा खासदार सुप्रिया सुळे पुन्हा एकदा अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अहिल्यानगर शहराचे आमदार संग्राम जगताप यांच्यावर बरसल्या. विधानसभा निवडणुकीनंतर हिंदुत्वाच्या मुद्या हाती घेऊन संग्राम जगताप महाराष्ट्रभर मोर्चा, आंदोलनांमध्ये हजेरी लावत आहेत. यावर सुप्रिया सुळे यांनी थेट हल्ला चढवला. यांचं काय कर्तृत्व आहे, हे आमच्या मतदारसंघात येऊन भाषण करतात. माझ्या मतदारसंघात येऊन, अशी भडकावू भाषणे केली ना, आता गाठ माझ्याशी आहे. माझं मतदारसंघ जिथे सुरू होतो ना, त्याच ठिकाणीच मी आता आडवी उभी राहणार आहे. बघतोस कसा येतो ते, नही चलेगा ये सब, असा शब्दात सुप्रिया सुळे यांनी ठणकावलं आहे.**

सुप्रिया सुळे संगमनेर तालुक्यातील सावरगाव घुले गावाच्या दौऱ्यावर होत्या. त्यावेळी त्यांनी सरकारच्या तिजोरीत खडखडाट झाला आहे. शेती, महागाई, बेरोजगारी आणि भ्रष्टाचाराचे मुद्दे वाढल्याने, सरकारच्या आर्थिक परिस्थिती इतकी गंभीर आहे की, सरकारकडे पैसे नाही. हे असंच राहिले तर काही महिन्यांनी सरकारकडे पगार करायल सुद्धा पैसे राहणार नाही, असे सांगत असताना सरकारबरोबर वैचारिक लढाई सुरू आहे अन् ती सुरूच राहणार, असल्याचा इशारा दिला.

सुप्रिया सुळे यांनी अहिल्यानगर शहराचे आमदार संग्राम जगताप (डरपसीरा गरसीर्रि) यांचे नाव न घेता जोरदार हल्ला चढवला. मध्यंतरी आमच्याकडे आले होते. जोरजोरात भाषण करून गेले. भडकावू भाषण केले. लोकांमध्ये भांडण लावणारी भडकावू भाषा आपण सहन करणार नाही. नगर मधले जनतेने ही, अशी भाषण सहन केलेली नाहीत. कारण, महाराष्ट्र आहे, छत्रपती शिवाजी महाराजांचा महाराष्ट्र आहे. फुले-शाहू-आंबेडकरांचा हा महाराष्ट्र आहे, असे ठणकावून सुळे यांनी सांगितले.

''दिवाळीत हिंदू लोकांकडूनच दिवाळीचं सामान घ्या', असे म्हटले होते ना, त्यांना तीनच प्रश्न करते, असे सांगून, टाटा कुटुंब हे कुठल्या समाजाचं, पारशी होते. त्यांचं मीठ, साखर, गाडी, रस्ता चालतो, पार्लमेंटची संपूर्ण इमारत टाटांनी बांधली आहे, हे चालतं, मग त्यांच्याकडून घ्यायचं का नाही सामान? कोविडमध्ये लसीकरण झालं, ती लस कोणी तयार केली? सिरमने! त्याच्या मालकाचे नाव काय? साइरस पुनावाला, तो देखील पारशी आहे. मग लस घ्यायची का नाही? सिपला कंपनीचा मालकाचे नाव काय आहे, तर युसूफ हमीद, दिवाळी चार दिवस सिपलाच्या गोळ्या घेतल्या नाही का कोणी?,' असे प्रश्न सुप्रिया सुळे यांनी केले.'हा विचारच बुरसटलेला आहे. त्यांना वाटत असून हे चालणार आहे. पण पुरोगामी महाराष्ट्र असली भाषण खपवून घेणार नाही. मी तर खपूनच घेणार नाही. माझ्या मतदारसंघात एकदा आले. मी जाहीरपणे सांगते, लगेच भाजपचे आमदार राहुल कुल यांना, मी फोन केला, हा बाबा आपल्या मतदारसंघात येतोय, इथं आताच दगडफेक झालेली आहे, याला आत्ताच आवर. राहुल कुल यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला, आपल्या मतदारसंघाचा नुकसान होणार नाही, त्यासाठी आपण एक राहू,' असे म्हणत मला आश्वस्त केल्याचा किस्सा सुप्रिया सुळे यांनी सांगितला.

### शेतकऱ्यांसाठी आंदोलन कधी केलं का?

'आम्हाला अभिमान आहे, आम्ही भारतीय असल्याचा. 'सारे जहाँ से अच्छा हिन्दोस्ताँ हमारा', असे असताना मग आम्हाला जाती-जतीमध्ये का अडकवता? शेतकऱ्यांच्या अश्रू का दिसत नाहीत, त्याच्यावर का भाषण करत नाही? एक ३२ वर्षाचा कॉन्ट्रॅक्टरने आत्महत्या केली, त्याच्या घरी का गेला नाहीत? आत्महत्या केलेल्या शिक्षकाच्या घरी गेलेले हे लोक कधी बघितलेत का?शेतकऱ्यांच्या पिकासाठी भाव मिळावी यासाठी यांनी आंदोलन केलं आहे का? असली भाषण करून, तुम्ही फक्त जातीय तेढ निर्माण करता, आपल्या भारताचे नुकसान करता, हे कुठेतरी आपण थांबवलं पाहिजे आणि यासाठी आपण पण कुठे ना कुठेतरी बोललं पाहिजे, मी नेहमीच बोलते आणि बोलत राहणार,' असे सुप्रिया सुळे यांनी म्हटले.

### २०२९ ला यांना घरी पाठवा

'मला विश्वास आहे की, २०२९ला असल्या लोकांना हीच मायबाप जनता घरी पाठवली, पंडित जवाहरलाल नेहरूंनी पुस्तक इथंच लिहिलं, अहिल्यानगरमध्ये तुरुंगात असताना लिहिलेलं हे पुस्तक संपूर्ण जग आज वाचतं आहे, असे सांगून, एक बरं झालं त्यांना त्यांच्या पक्षाने नोटीस पाठवली आहे, पुढे काय होईल हे मला माहित नाही.पण पक्षाने त्यांना आवरलं पाहिजे, पक्षातून काढून टाका, कधीतरी आयुष्यात स्ट्राँग डिसीजन घेतले गेलेच पाहिजे, कारण की ते राज्याचे हिताचे असतात,' असे म्हणताना सुप्रिया सुळेंनी पुन्हा एकदा अजितदादांचे निर्णयाकडे लक्ष वेधले.

## इटोली डोंगरतळा येथे झालेल्या सामूहिक बलात्कार प्रकरणी जिंतूर बंद

### मोर्चा काढून आरोंपीना कठोर शिक्षा करण्याची मागणी

जिंतूर, (दिव्य न्युज):- आज दिनांक २७ ऑक्टोबर रोजी सकल जिंतूर वासियांच्या वतीने जिंतूर बंद ठेवून तहसील कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला होता या मोर्चामध्ये मोर्चेकर्यांनी इटोली शिवारातील डोंगरतळा येथे काही दिवसा पूर्वी एका मित्रासोबत तरुणी



फिरण्यासाठी गेली असता त्या ठिकाणी सहा तरुणांनी त्यांना दाट दपट करून सामूहिक बलात्कार केल्याचे सोशल मीडियावर व्हिडिओ व्हायरल झाले होते ते पोलीसाच्या निदर्शनास आले होते त्याची दखल घेत पोलिसांनी लगेच चित्रीकरण मध्ये असलेल्या तरुणांना तात्काळ अटक केली होती व अत्याचार झालेल्या तरुणीचा शोध घेऊन त्या तरुणीला विश्वासात घेऊन गुन्हा दाखल करण्यात आला होता व सर्व आरोपींना पोलिसांनी अटक केली परंतु याप्रकरणी

▶▶ पान २ वर

## अजितदादांच्या राष्ट्रवादीच्या कार्यालयात लावणीचे ठुमके

### सोशल मीडियावर तळवशे ने धुमाकूळ घातला



नागपूर , (दिव्य न्युज):- अजित पवार यांच्या राष्ट्रवादीच्या नागपूर कार्यालयात दिवाळी मिलन कार्यक्रमात लावणीवर ठुमके लगावण्यात आले. समाज माध्यमांवर वेगाने पसरलेल्या चित्रफितीत राष्ट्रवादीचे पदाधिकारी, महिला कार्यकर्त्या लावणीचा आनंद घेत असताना दिसून येत आहेत.

आगामी महापालिका निवडणूक आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना डोळ्यासमोर ठेवून दिवाळी सणाच्या निमित्ताने ▶▶ पान २ वर



## बीड शहर पोलीस ठाण्याचे पोलीस बेखबर.... जाम झालेल्या ट्रॉफिकची त्या पोलिसांना नाही खबर

बीड : अशीच काहीशी स्थिती बशीरगंज भागात असून त्या पुजारीनी रस्त्याला स्वतःच्या बापाची मिळकत समजली आहे. चक्क रस्ताच ते विक्रेत्यांना भाड्यावर देवू लागला. कोणाचे वाहन त्या जागेवर उभा राहु नये म्हणून स्वतःच्या मालकीचे तीन ते चार वाहने ते त्या रस्त्यावर उभे करून ट्रॉफिक जाम करण्यास कारणीभुत ठरत आहेत. प्रत्येक विक्रेत्यांकडून पाच हजारांच्या आसपास रक्कम घेवून ते नगर पालिकेचा रस्ता भाड्याने देवू लागला ना पोलिसांना खबर ना नगर पालिकेला खबर, पोलिसांना फोन करून ही त्याकडे त्यांचे दुर्लक्ष

## काँग्रेसनं 'स्थानिक'चं रणशिंग फुंकलं

### 'मविआ'मध्ये स्वबळाचा नारा देण्यात आघाडी, थोरातांचा पदाधिकाऱ्यांच्या सुरात-सूर?

मुंबई , (दिव्य न्युज):- महाविकास आघाडी आणि महायुतीमधील सर्व पक्षातील पदाधिकाऱ्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी स्वबळाचा नारा दिला आहे. परंतु पक्षश्रेष्ठींना अजून त्यावर शिक्कामोर्तब केलेलं नाही. काही जिल्ह्यांमध्ये भाजपच्या स्थानिक नेते, मंत्र्यांनी स्वबळासाठी पक्ष नेतृत्वाकडून ग्रीन सिग्नल मिळाल्याचे सांगत आहे.

भाजपबरोबरच आता काँग्रेसचे पदाधिकारी स्वबळाचा नारा देऊ लागले आहेत. अहिल्यानगरमधील काँग्रेस



आमदार, पदाधिकाऱ्यांनी 'स्थानिक'साठी स्वबळाचा नारा दिला आहे. काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी देखील जवळपास पदाधिकाऱ्यांच्या सुरात-सूर मिसळला आहे.संगमनेरच्या अमृतनगर इथं अहिल्यानगर जिल्हा काँग्रेस कमिटीची बैठक झाली. काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य तथा ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात, आमदार हेमंत ओगले, कार्याध्यक्ष सचिन गुजर, जिल्हा बँकेचे संचालक करण ससाणे, प्रतापराव शेळके, मधुकरराव नवले आदी उपस्थित होते.

▶▶ पान २ वर

## हैदराबाद गॅझेट 'जीआर'ला स्थगिती देण्यास हायकोर्टाचा स्पष्ट नकार

### राज्य सरकारसह मराठा समाजाला मोठा दिलासा



मुंबई , (दिव्य न्युज):-राज्य सरकारने हैदराबाद गॅझेटच्या आधारे मराठवाड्यातील मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षणासाठी काढलेल्या शासन निर्णयाला (जीआर) अंतरिम स्थगिती देण्यास मुंबई उच्च न्यायालयाने नकार दिला आहे. सरकार आणि मराठा समाजासाठी हा मोठा दिलासा मानला जात आहे.

मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती चंद्रशेखर आणि न्या. गौतम अंखड यांच्या खंडपीठासमोर मंगळवारी याप्रकरणी सुनावणी झाली. या सुनावणीवेळी न्यायालयाने २ सप्टेंबरच्या शासन निर्णयाला अंतरिम स्थगिती देण्याची मागणी फेटाळली. याचाच अर्थ राज्य सरकारने जारी केलेला हैदराबाद गॅझेटच्या अंमलबजावणीचा आदेश ▶▶ पान २ वर

## माजलगावचे जेष्ठ पत्रकार कमलाकर कुलथे यांचे निधन

बीड, (दिव्य न्युज):- माजलगाव टाइम्स चे निवासी संपादक कमलाकर कुलथे यांचे अल्पशा आजाराने आज सोमवारी (दि.२७) सकाळी ७:३५ वाजण्याच्या सुमारास निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ५८ वर्ष होते. मनमिळावू स्वभावामुळे ते सर्व परिचित होते. तसेच जुन्या काळातील पत्रकार असल्याने सर्वपरिचित व्यक्तीमत्व हरवल्याने माजलगाव सह जिल्ह्यातील पत्रकारिता क्षेत्रातील एक तारा निखळला असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे. कमलाकर कुलथे यांच्या पश्चात एक मुलगा, मुलगी, सुन , नातवंडे, तीन भाऊ असा परिवार आहे. कुलथे परिवारावर कोसळलेल्या दुःखात सायं.दैनिक दिव्य वार्ता, कश्मकश परिवार सहभागी आहे.



# धारूर घाट राष्ट्रीय महामार्ग होऊनही ठरतोय अडचणींचा



धारूर , (दिव्य न्युज):- पालखी मार्ग असणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ सी वरील धारूर आंबेडकर चौक ते धुनकवड पाटी या १२ किलोमीटर अरुंद रस्त्यामुळे धारूर घाटात नेहमीच वाहतूक ठप्प होण्याचे प्रकार होत आहे. यामध्ये राष्ट्रीय रस्ते विकास मंडळ व एमएसआरडीसी यांच्या वादामध्ये हा रस्ता रुंदीकरण गेल्या अनेक वर्षा पासून रखडला असून याचा त्रास मात्र प्रवासी व वाहतूकदारांना सहन करावा लागत आहे.

त्यामुळे तात्काळ प्रशासनाने याकडे लक्ष देऊन या घाटाचे रुंदीकरण करावे अशी मागणी नागरिकांतून होत आहे. लोकप्रतिनिधी व नेत्यांनी श्रेयासाठी डांगोरा पिटण्यापेक्षा या रस्त्या रुंदीकरणाकडे लक्ष द्यावे अशीही मागणी होत आहे.धारूर ते तेलगाव हा रस्ता राष्ट्रीय महामार्ग पालखी मार्ग ५४८ सी हा होऊन दहा वर्षाचा कालावधी होता आला तरीही धारूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते धुनकवड पाटी हा १२ किमी रस्ता अद्याप ही रुंदीकरण न झाल्याने व यामध्ये तीन किलोमीटर धारूर चा अवघड घाट असल्याने वाहतुकीस नेहमीत अडथळे होत आहेत.घाटामध्ये वाहतूक रखडणे व एखादे वाहन बिघडले किंवा अपघात झाला तर कित्येक तास वाहतूक ठप्प होण्याचे प्रकार हा नियमित चा खेळ झाल्याने सर्व वाहनधारक व या रोडने येणारे दहा ते पंधरा गावचे नागरिक बेजार होऊन गेले आहेत एम एस आर डी सी ने हा रस्ता करताना निकृष्ट दर्जाचा करून काम आटपले मात्र आता रस्ता रुंदीकरणाचा हा राष्ट्रीय महामार्ग खात्याकडे जात असल्याने दोन्ही विभागाच्या वादात त्या रस्त्याचे रुंदीकरण रखडत पडले आहे.

नेहमीच विविध नेते राष्ट्रीय महामार्ग मंत्र्याची भेट घेतलेले फोटो छापून व रस्ता होत असल्याचे दाखवून नागरिकांची दिशाभूल करत आहेत मात्र वाहतूक दाखवून नागरिकांची दिशाभूल करत आहेत मात्र वाहतूक रखडणे व अपघात हे या रस्त्यावर नियमितचे झाले आहे. राष्ट्रीय महामार्ग व एमएसअ-रडीसी यांच्यातील वाद हा निपटून तात्काळ या रस्त्याचे रुंदीकरण करावे व नागरिकांचा प्रश्न मार्गी लावावा नेहमीची अडचण दूर करावी अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

# भाऊबीजेच्या दुसऱ्याच दिवशी ऊसतोड कामगारांनी धरली कारखान्याची वाट

## धारूर तालुक्यातील अनेक गावे पडली ओस

धारूर, (दिव्य न्युज):- ग्रामीण भागात ऊसतोड मजुरांची संख्या अधिक असल्याने ऊसतोड मजुरांचा तालुका म्हणुन धारूर तालुक्याची ओळख आहे. यंदा अतिवृष्टीने हातातोंडाशी आलेला घास हिरावल्याने खर्चा इतकेही उत्पादन झाले नाही. यामुळे आर्थिक संकटातच दिवाळीचा सण गोड करावा लागला. बहिणीच्या हातून ओवाळणी करुन घेत भावनाने भाऊबीजेच्या दुसऱ्या दिवसीपासूनच कारखान्याची वाट धरली आहे. ट्रॅक्टर, ट्रक, बैलगाड्यांनी प्रवास करत ऊसतोड कामगाराचे जत्थेच्या-जत्थे कारखान्याच्या दिशेने प्रवास करीत आहेत. यामुळे धारूर तालुक्यातील अनेक गावे माणसांअभावी ओस पडू लागली आहेत. आतापर्यंत तालुक्यातून जवळपा ७० हजार ऊसतोड मजुरांचे स्थलांतर झाले आहे.

दसरा-दिवाळीतच या ऊसतोड मजुराना कारखान्याचे बोलावणे आले आहे. त्यामुळे शेतातील कामे उरकून ऊसतोड मजुरांनी बिऱ्हाड बांधले आहे. शेतीची अनिश्चितेमुळे कुटूंबाच्या उदनिर्वाहासाठी काट्या-कुट्यांचा रस्ता तुडवडत ऊसतोडीसाठी कामगार कुटूंबासह सणासुदीतच घराबाहेर पडला आहे. महाराष्ट्र तसेच कर्नाटक राज्यातील विविध साखर कारखान्यांमध्ये उसतोडणीच्या हंगामाला वेग आला असून, धारूर तालुक्यातील मजूर मोठ्या संख्येने या कामासाठी स्थलांतरित होत आहेत. सध्या



खामगाव-पंढरपूर या मुख्य रस्त्यावर दररोज शंभर ते दीडशे ट्रॅक्टर आणि ट्रक उसतोडणी मजूर घेऊन दक्षिणेकडे रवाना होत आहेत. दिवसा प्रमाणेच रात्रीही हे स्थलांतर सुरू असल्याने रस्त्यांवर वाहनांची सततची वर्दळ सुरू आहे. काही कुटुंबे मुलाबाळांसह, जनावरे आणि घरसंसार घेऊन निघालेल्या या कुटूंबाकडे पाहणाऱ्यांचे डोळे पाणवत आहेत. आर्थिक अडचणीत मुकादमामार्फत कारखाना व्यवस्थापन उचल देवून मजुरांना बांधून ठेवते. त्यामुळे मन नसतानाही घेतलेल्या उचलीच परतफेड करण्यासाठी ऊसतोडीसाठी जावेच लागते. त्याच प्रमाणे हिवाळा आणि उन्हाळ्यात कुटूंबाचा उदरनिर्वाह भागवता येईल येवढा रोजगार गावात उपलब्ध होत नसल्याने पर्यायच उरत नाही. गावात आता केवळ आढळताहेत वृद्ध तसेच लहान बालके मुलगा-सुन , आई-वडील ऊसतोडीच्या कामासाठी बाहेरगावी गेल्याने गावांमध्ये केवळ लहान शाळकरी मुले आणि वृध्द महिला पुरुष वास्तव्यास आहेत. शासनाने अशा मुलांच्या शिक्षणासाठी शाळांमध्येच त्यांच्या भोजनाची व्यवस्था केली आहे. त्यामुळे विद्यार्थी आजी-आजोबा जवळ वास्तव्य करुन शिक्षण घेऊ शकतात. यासाठी धारूर तालुक्यामध्ये ऊसतोड कामगारांच्या पाल्याच्या शिक्षणासाठी शिक्षण विभागाकडून सर्वेक्षण करण्यात आलेले आहे. त्यांच्या सहा महिन्याच्या कालावधीसाठी गावो-गावी भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे.

धारूर तालुक्यात उद्योग धंद्दे, नियमीत रोजगाराचा अभाव यामुळे ग्रामीण भागातील अर्थकारणच थांबते आणि जनता ऊसतोडी करत रानोमाळ फिरते. हे कुठे तरी थांबले पाहिजे आणि गावं समृध्द झाली पाहिजे यासाठी उद्योग धंद्याचा विकास आणि रोजगाराची उपलब्धता होणे आवश्यक आहे. परंतु धारुर तालुक्यातील सर्वसामान्य जनता मात्र गेले अनेक वर्षांपासून परिस्थितीत सुधारणा होण्याची आस लावून बसली असताना लोकप्रतिनिधी आणि शासन व प्रशासन मात्र भावनाशुन्य बनले असल्याने ऊसतोडीचा कोयता हातात घेऊन सणासुदीतच मजुरांना घराबाहेर पडावे लागते.

# भरदिवसा घराचे गेट तोडून २७ तोळे सोन्याचे दागिने लंपास

केज (दिव्य न्युज):- केज तालुक्यात भर दिवसा घराचे लोखंडी गेट तोडून आतील पेटी व धान्याच्या कोठीत ठेवले २७ तोळे सोन्याचे दागिने चोरीला गेले आहेत. घटनास्थळी श्वानपथक आणि ठसे तज्ज्ञ यांच्या पथकाने भेट दिली आहे.

या बाबतची माहिती अशी की, केज तालुक्यातील कोरेगाव येथील वैतागवाडी नावाच्या वस्तीवर राहत येथे दिनांक २३ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ४:१५ ते ५:३० वा. च्या दरम्यान बळीराम भगवान तांदळे हे आणि त्यांची पत्नी शेतात गेले होते. अज्ञात चोरट्यांनी घराच्या लोखंडी चॅनल गेटचे कुलुप तोडून घरात असलेल्या पेटी आणि धान्याच्या कोठीत ठेवलेले आठ तोळे वजनाच्या सोन्याच्या बांगड्या, सोन्याचा हार, नेकलेस, व अन्य असे दागिने एकूण २७ तोळे ४ ग्रॅम वजनाचे दागिने लंपास केले. ज्याची किंमत ५ लाख ८१ हजार ५०० रु दागिन्यांची चोरी झाली आहे.बळीराम तांदळे यांच्या फिर्यादी वरून अज्ञात चोरट्या विरुद्ध केज पोलिस ठाण्यात गु. र. नं. ५८२/२०२५ भा. न्या. सं. ३०५(ए), ३३१(३) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक उमेश निकम हे तपास करीत आहेत.श्वान पथक आणि ठसे तज्ज्ञ :- घटनास्थळी पोलिसांचे श्वानपथक आणि ठसे तज्ज्ञ यांनी भेट देऊन पुरावे हस्तगत करण्यासाठी प्रयत्न केले. घटनास्थळी आयपीएस तथा सहाय्यक पोलिस अधीक्षक व्यंकट राम यांनी भेट देऊन तपासा संदर्भात अधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले.

पान ४ वरून

## बीडमध्ये पदवीधर मतदार

प्राध्यापक जावेद पाशा आणि शिक्षक भारतीचे जिल्हाध्यक्ष अयाज कागज़ी सर यांच्या सहकार्याने औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघांमध्ये मतदार नोंदणी साठी जनजागृती अभियान राबविण्यात आले.

या अभियानास शहरातील पदवीधर बांधवांनी प्रचंड प्रतिसाद देत हे अभियान यशस्वी केले. या जनजागृती अभियानास जवळपास ५०० ते ६०० पदवीधर बांधवांनी मतदार नोंदणीचे फॉर्म भरून घेतले तसेच त्यांना सदरील फॉर्म तहसील कार्यालयाकडे दाखल करण्यासाठी सांगण्यात आले. यावेळी ज्येष्ठ नेते माईन मास्टर, माजी उपनगराध्यक्ष फारुख पटेल, दैनिक तामीर चे संपादक काझी मगदूम, लोकमत टाइम्सचे सी. आर. पटेल, समाजसेवक मुसाखान, निवृत्त तहसीलदार शेख कलीम, उपशिक्षणाधिकारी खतीब सर, माजी नगरसेवक मसी भाई ज्येष्ठ नेते सलाम सेठ,राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अखील शेख, कॉंग्रेस नेते गणेश बजगुडे पाटील, एडवोकेट महेश धांडे, निवृत्ती इंजिनिअर गफार खान, शेख रफिक सर, शेख पाशाभाई, शिराज सिद्दिकी, शेख सलीम, बदियोद्दिन इनामदार, शेख समीर, यकीन सर, कॉंग्रेसचे विद्यार्थी आघाडीचे सलीम भाई, यांच्यासह असंख्य पदवीधर बांधवांनी उपस्थिती लावून पदवीधर मतदार नोंदणी जनजागृती अभियानास भरभरून पाठिंबा देत हे अभियान यशस्वी करण्यासाठी सर्वांनीच प्रयत्न केले. पदवीधरांनी जागरूक राहून पदवीधरांनी जास्तीत जास्त प्रमाणात नाव नोंदणी करावी असे आवाहन मुज्तबा खान, प्रा.अमर शेख ड. प्रा. इलियास इनामदार, प्रा.जावेद पाशा यांनी केले आहे.

## जिल्हा परिषद शाळेतील २०००

मध्ये लागून प्रार्थना, राष्ट्रगीत, भक्तीगीत गात २५ वर्षांनी त्याचा अनुभीती सर्वांनी घेतली, तसेच शिक्षकांचा आदर हृदय सत्कार करत वर्गमित्र परिवारा तर्फे सन्मान पत्र चि फ्रेम म्हणून सरांना देण्यात आली, डी डी. साखरे सर, तुकाराम सानप सर, शेख एस. एम, साखरे डी एस व सध्याचे मुख्यध्यापक श्री. गणेश अकुस्कर सर उपस्थित होते. नंन्तर शाळेतील पारंपरिक खेळ खेळत शाळेतील तो आनंद पुन्हा घेण्याचा अनुभव सर्वांनी घेतला,ङ्ग पुन्हा नाश्ता घेऊन धारूर येथील आर्या हॉल मध्ये सांस्कृतिक कार्यक्रम व इतर विविध स्पर्धा घेऊन बक्षीस वाटप करत, जुन्या फोटो प्रोजेक्टर वर दाखवत सर्वां च्या बाल पनात गेल्याची अनुभूती सर्वात झाली, सर्वांनी बाल पणातील किस्से, शाळेतील त्याचा आठवणीतील गोष्टी, मित्र मैत्रिणीचे नोक झोक त्या नंन्तर एकत्र येण्याचे सर्वांचे विविध आठवणींनी सर्वांचे डोळे पानवून सोडले सर्व भावनिक साद घालत सर्व असेच एकत्र राहण्याचा संकल्प घेण्यात आला जेवण करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## जिल्हा परिषद, पंचायत

आणि गणातून पक्षा कडे उमेदवारी मिळावी यासाठी मागणी देखील केली. यावेळी बैठकीला संबोधित करताना शिवसंग्राम प्रदेश उपाध्यक्ष प्रभाकर कोलंगडे यांनी शिवसंग्रामची भूमिक स्पष्ट केली, गतवेळीच्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांच्या विचाराचे चार जिल्हा परिषद सदस्य आणि तीन पंचायत समिती सदस्य जनतेने निवडून दिले होते. आज देखील बीड मतदार संघात शिवसंग्राम शिवाय कोणतेही राजकीय गणित पूर्ण होणार नाही. त्यामुळे सर्व कार्यकर्त्यांनी निवडणुकीच्या तयारीला लागावे बीड मतदार संघातल्या सर्व जागा आपल्याला लढवायच्या आहेत आणि शिवसंग्रामच्या विचाराचे प्रतिनिधी आपल्याला जिल्हा परिषद आणि पंचायत समितीमध्ये पाठवायचे आहेत. स्वतंत्र निवडणुका लढवायच्या की आघाडी करायची याचा निर्णय डॉ. ज्योतीताई घेतील असे प्रतिपादन त्यांनी केले.

पान १ वरून

## इटोली डोंगरतळा येथे झालेल्या

प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरीत्या या आरोपींना मदत करणाऱ्या लोकांना सुद्धा सह आरोपी करावे अशी मागणी मोर्चेकर्यांनी जिंतूरचे तहसीलदार राजेश सरोदे यांच्याकडे केली आहे हा मोर्चा हनुमान मंदिर ते तहसील कार्यालयावर काढण्यात आला होता यामध्ये माजी नगराध्यक्ष प्रताप भैय्या देशमुख, माजी नगराध्यक्ष सचिन उर्फ मुन्ना गोरे, डॉ. पंडित दराडे भाजप तालुका अध्यक्ष गोविंद थिटे भाजप मधील सर्व सेल चे कार्यकर्ते व जिंतूर शहरातील व्यापारी तसेच सर्व समाजातील नागरिक उपस्थित होते मोर्चा शांततेत पार पडला पोलिसांनी कडक बंदोबस्त ठेवला होता सहाय्यक पोलीस अधीक्षक श्री जीवन बेनिवाल, जिंतूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री गजेंद्र सरोदे, व त्यांचे सर्व सहकारी पोलीस यांनी बंदोबस्त तैनात केला होता.

## अजितदादांच्या

राजकीय पक्ष दिवाली मिलन कार्यक्रमांच्या माध्यमातून पक्षाच्या कार्यकर्ते-पदाधिकाऱ्यांना एकत्र आणून निवडणुकीच्या अनुषंगाने अनेकानेक मुद्द्यांवर चर्चा करीत आहे. राष्ट्रवादी अजित पवार गटानेही पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांसाठी दिवाळी मिलन कार्यक्रमाचे आयोजन केले होते. याच कार्यक्रमातील चित्रफित समाज माध्यमांवर वेगाने पसरत आहे.

चित्रफितीत अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष, महिला पदाधिकारी बसल्याचे दिसत आहे. त्यांच्यासमोर नटरंग चित्रपटातील मला जाऊ द्या ना घरी आता वाजले की बारा या लावणीवर एक महिला नृत्य करीत आहे. ही महिला पक्षाची कार्यकर्ता असल्याची माहिती समोर येत आहे.महायुती सरकारमध्ये असलेल्या राष्ट्रवादी कॉंग्रेसने महापालिका आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांवर विशेष लक्ष केंद्रित केले आहेत. पुणे, नागपूर, पिंपरी चिंचवड महापालिकांत पक्षाची कामगिरी उंचावण्याचा अजित पवार यांचा मानस आहे तर जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीत जास्त जास्त उमेदवार निवडून आणण्याचे पक्षाचे लक्ष्य आहे.

## कॉंग्रेसनं 'स्थानिक'च

अहिल्यानगर जिल्हा हा कॉंग्रेस विचारांचा बालेकिल्ला राहिला आहे. सतत भूलथापा देऊन आणि जातीयवाद करून सत्तेवर आलेल्या महायुतीच्या पक्षांचे खरे रूप जनतेला कळाले आहे. यामुळे सर्वसामान्य जनता, नागरिक, युवक आणि महिला यांच्यामध्ये सत्ताधाऱ्याविरुद्ध मोठा संताप निर्माण झाला असून कॉंग्रेसला अनुकूल वातावरण आहे. आगामी जिल्हा परिषद ,पंचायत समिती व नगरपालिकेच्या निवडणुका कॉंग्रेस पक्षाने स्वबळावर लढवाव्यात, अशी एकमुखी मागणी कॉंग्रेस पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत करण्यात आली.

कॉंग्रेस कार्यकर्त्यांच्या भावना समजावून घ्या

आमदार हेमंत ओगले यांनी, कॉंग्रेस पक्षाला मोठी विचारधारा आहे. लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वावर जिल्ह्यातील नागरिकांचा मोठा विश्वास आहे. आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती व नगरपरिषदेमध्ये कॉंग्रेसच्या कार्यकर्त्यांना मोठी संधी आहे. कॉंग्रेस पक्षाकडून निवडणूक लढण्यासाठी अनेक कार्यकर्ते इच्छुक आहेत. त्यामुळे या सर्व निवडणुका कॉंग्रेस पक्षाने स्वबळावर लढवाव्यात, अशी जिल्ह्यातील तमाम कॉंग्रेसजनाची प्रमुख मागणी असून आमचे नेते बाळासाहेब थोरात साहेब यांच्याकडे कॉंग्रेस कार्यकर्त्यांच्या भावना आम्ही मांडलेले असून त्यांचा निर्णय आम्हाला मान्य असेल, सांगितले.

कॉंग्रेस पक्ष एक नंबरचा ठरेल

कार्याध्यक्ष सचिन गुजर यांनी, महायुतीच्या भूलथापांना लोक कंटाळले आहे. खरे तर विधानसभेच्या निवडणुकीमध्ये त्यांचा पराभव निश्चित होता. स्थानिक स्वराज्य संस्था या कार्यकर्त्यांसाठी मोठी संधी असून कॉंग्रेस पक्ष ही निवडणूक पूर्ण ताकदीनिशी लढू, असे सांगितले. करण ससाणे यांनी देखील देशाचे नेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली आता संपूर्ण देशातील वातावरण बदलले आहे. बिहारमध्ये सुद्धा कॉंग्रेसचे सरकार येणार असून महाराष्ट्रामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये कॉंग्रेस पक्ष एक नंबरचा ठरेल, असा विश्वास व्यक्त केला.

सर्वांचीच स्वबळाची भाषा

मधुकरराव नवले, शहाजी भोसले, अरुण म्हस्के आणि सचिन चौगुले यांनी महायुतीमध्ये चलबिचल आहे. ज्यांनी आयुष्यभर भाजपचे काम केले, त्या खऱ्या कार्यकर्त्यांना दुर्लक्षित करण्यात आले आहे. बाहेरून आलेल्यांना संधी दिली जात आहे. महायुतीमध्ये आता सर्व कॉंग्रेस आणि राष्ट्रवादीचे कार्यकर्ते आहेत, असा टोला लगावला. यावेळी सर्व तालुकाध्यक्ष व शहराध्यक्ष यांनी जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नगर परिषदा स्वबळावर लढवण्याची मागणी केली.फ

## हैदराबाद गॅझेट 'जीआर'ला

अंतिम सुनावणीपर्यंत वैध राहणार आहे. हैदराबाद गॅझेटसंदर्भातील शासन निर्णयाला त्वरित स्थगिती द्यावी, अशी मागणी कुणबी सेना, महाराष्ट्र माळी समाज महासंघ, अहिर सुवर्णकार समाज संस्था, महाराष्ट्र नाभिक महामंडळ, सामाजिक कार्यकर्ते सदानंद मंडलिक यांनी याचिकांद्वारे केली आहे.

याचिकाकर्त्यांच्या वतीने युक्तिवाद करताना सरकारचा निर्णय मनमानी, असंवैधानिक असल्याचा दावा माळी समाज महासंघाने केला. यापूर्वी मराठा समाजाला आरक्षण देण्याची गरज नसल्याचे अनेक आयोगांनी स्पष्ट केले होते. त्यानंतर नारायण राणे समितीने सर्वप्रथम मराठा समाजाला आरक्षण देण्याची शिफारस केल्यानंतर मराठा समाजाला सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास म्हणून आरक्षण देण्यात आले. सर्वोच्च न्यायालयाने हे आरक्षण नाकारले. मराठा समाजाला आरक्षण देण्याचे सर्व मार्ग बंद झाल्याने आता ओबीसींमधून त्यांना मागच्या दाराने आरक्षण देण्याचा घाट घातला जात असल्याचा दावा याचिकाकर्त्यांनी केला. तथापि न्यायालयाने प्राथमिक सुनावणीत त्यांचा युक्तिवाद ऐकल्यानंतर शासनाचा निर्णय तात्पुरता रद्द करण्याची मागणी अमान्य केली.

राज्य शासनाने हैदराबाद गॅझेटवरून जारी केलेल्या मराठा विरूध्द ओबीसी संघटनामध्ये कलगीतुरा सुरू असताना आणि सरकारला धारेवर धरण्याचे प्रयत्न विरोधकांनी चालवले असतानाच उच्च न्यायालयाने ही भूमिका घेतली याला विशेष महत्व आहे.राज्य सरकारच्या वतीने महाधिवक्ता वीरेंद्र सराफ यांनी युक्तिवादात सांगितले की, हैदराबाद गॅझेट हा ऐतिहासिक दस्तावेज आहे. त्यामध्ये मराठा आणि कुणबी समाजामध्ये सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक सारखेपणा असल्याचे ठोस पुरावे आहेत. त्यामुळे कुणबी मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण देणे हे न्याय्य आणि कायदेशीरदृष्ट्या योग्य पाऊल आहे, असे सरकारचे मत बनले. या युक्तिवादावर न्यायालयाने प्राथमिक टप्प्यावर समाधान व्यक्त केले आणि शासन निर्णयाला स्थगिती देण्यास नकार दिला.

# अंबाजोगाईत धार्मिक कार्यक्रमात युवकाचा विजेच्या धक्क्याने मृत्यू



अंबाजोगाई , (दिव्य न्युज):- दिव्य ज्योती जागृती संस्थेच्या वतीने शहरात सुरू असलेल्या सात दिवसीय भागवत कथा ज्ञानयज्ञात दुर्दैवी घटना घडली आहे. रविवारी रात्री प्रवचनादरम्यान विजेचा धक्का बसून प्रशांत सुधाकर सोनवणे (वय २३) या युवकाचा मृत्यू झाला.

मिळालेल्या माहितीनुसार, दिव्य ज्योती परिवार लातूर संस्थेच्या संवर्धन प्रकल्पांतर्गत अंबाजोगाईतील योगेश्वरी महाविद्यालयाच्या प्रांगणात २५ ते ३१ ऑक्टोबर दरम्यान भागवत महापुराण कथा आयोजित करण्यात आली आहे. या कथेत आशुतोष महाराज यांच्या शिष्या साध्वी अदिती भारती प्रवचन देत आहेत.रविवारी दुसऱ्या दिवशीच्या कार्यक्रमादरम्यान आरती सुरू असताना प्रशांत सोनवणे याला थ्री-फेज विद्युतपुरवठ्याचा जोरदार धक्का बसला. तो काही अंतरावर फेकला गेला. उपस्थितांनी तत्काळ त्याला स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालयात दाखल केले, मात्र डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले.

मयत प्रशांत याचे आई-वडील दोघेही स्वाराती रुग्णालयात कार्यरत आहेत. अतिशय धार्मिक असणारे हे संपूर्ण सोनवणे कुटुंब या भागवत कथा सप्ताहाच्या कार्यक्रमात सेवा बजावत होते. याच दरम्यान झालेल्या दुर्घटनेमुळे शहरात हळहळ व्यक्त होत आहे.

# बीडमध्ये पदवीधर मतदार नोंदणी जनजागृती अभियानास पदवीधरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## मुज्तबा खान, प्रा.अमर शेख ॲड. इलियास इनामदार, प्रा.जावेद पाशा यांचे प्रयत्न यशस्वी

बीड , (दिव्य न्युज):- बीडमध्ये पदवीधर मतदार नोंदणी जनजागृती अभियान राबविण्यात आले, या अभियानाचा उद्देश समाजामध्ये अनेक पदवीधर बांधव आहेत, लोकशाहीचे चौथे आधारस्तंभ हेच मतदार असून त्याची जाणीव पदवीधर मतदारांमध्ये व्हावी तसेच पदवीधर बांधव सुशिक्षित असून त्यांना स्वतःला स्वतःचा हक्क बजावता यावा, पदवीधरांची ताकद दिसावी, पदवीधर यांचे प्रश्न मांडणारा योग्य प्रतिनिधी विधान परिषदेच्या सभागृहात पाठविता यावा, यासाठी मतदार नोंदणी आवश्यक आहे.

यासाठीच डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ स्तरावर कायम पदवीधरांचे प्रश्न सोडवणारे राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पदवीधर संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष प्राध्यापक अमर



शेख यांच्या पुढाकाराने व मिलिया कॉलेजचे निवृत्त मुख्याध्यापक तथा उर्दू शिक्षक संघटनेचे महाराष्ट्र प्रदेश सचिव मुज्तबा अहमद खान यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच लोकसेना संघटनेचे अध्यक्ष तथा शैक्षणिक चळवळीतील नेते ॲडव्होकेट प्राध्यापक इलियास इनामदार व पत्रकार तथा मिल्लीया कॉलेजचे

▶▶ पान २ वर

# जिल्हा परिषद शाळेतील २००० बॅचचा स्नेहमिलन कार्यक्रम उत्साहात संपन्न



धारूर, (दिव्य न्युज):- किल्ले धारूर शहरातील जिल्हा परिषद माध्यमिक शाळा येथील सन २००० च्या १० वी वर्गातील बॅच चे स्नेहमिलन कार्यक्रम अतिशय थाटा माटात सर्व वर्गमित्राच्या सोबतीने पूर्ण झाले, सर्व विध्यार्थी तब्बल २५ वर्षांनी एकत्र आले, यात विविध क्षेत्रात वकील, मिल्ट्री,डॉक्टर, सी.ए, इंजिनिअर,व शिक्षक, मुख्याध्यापक, व्यवसायिक, कॉन्ट्रॅक्टर, सामाजिक क्षेत्र, राजकीय क्षेत्र, गृहिणी, ऑटो चालक,शेतकरी,ब्युटी शियन, लेडीज फॅशन डिझाईनर अशा समाजाच्या विविध स्तरातून येऊन देखील या स्नेहमिलन कार्यक्रमात एक सामान्य विध्यार्थी म्हणून एक होत पुन्हा २५ वर्षा नंन्तर देखील त्याच हर्ष उत्साहात त्याच कल्पनेतून पुन्हा तिच शाळा भरवली, तीच प्रार्थना त्याच पद्धतीने शिक्षकांना आमंत्रीत करून त्याच्या समोर लाईन

▶▶ पान २ वर

# जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसंग्रामची पार पडली बैठक

## शिवसंग्राम शिवाय कोणतेही राजकीय गणित पूर्ण होणार नाही - प्रभाकर कोलंगडे

बीड , (दिव्य न्युज):- आगामी काळात होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसंग्राम भवन येथे शिवसंग्राम अध्यक्ष डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांच्या सूचनेवरून शिवसंग्रामच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक संपन्न झाली. या बैठकीस शिवसंग्रामचे प्रदेश उपाध्यक्ष प्रभाकर कोलंगडे, जिल्हाध्यक्ष प्रा. सुभाष जाधव, जिल्हा



सरचिटणीस अनिल घुमरे,शहराध्यक्ष सुहास पाटील, सुनील शिंदे आदीसह शिवसंग्रामचे गट, गण आणि सर्कलचे प्रमुख पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या बैठकीस बीड आणि शिरूर तालुक्यातील सर्व सर्कलचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. यात जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकी संदर्भात सखोल चर्चा करण्यात आली. इच्छुकांनी आप आपल्या गट

▶▶ पान २ वर

# डेंग्यू सदृश्य तापाने वस्सा येथील शाळकरी विद्यार्थ्याचा मृत्यू

जिंतूर, (दिव्य न्युज):- जिंतुर तालुक्यातील वस्सा या ठिकाणी डेंग्यू सदृश्य तापाने जिंतूर तालूक्यातील वस्सा येथिल शाळकरी विद्यार्थ्याचा उपचारा दरम्यान छत्रपती संभाजी नगर येथिल घाटी शासकीय वैद्यकीय रुग्णालयात मृत्यू झाल्याची घटना दि.२६ऑक्टोबर रोजी रविवारी सायंकाळी ५:३० वा च्या सुमारास घडली.वस्सा येथिल म .फुले विद्यालयात इ.५ वी त शिकणाऱ्या फरहान शेख रेहान वय(११ वर्ष) याला दोन दिवसांपूर्वी अचानक ताप येऊन शरिरातील पेश्यांची संख्या झपाट्याने कमी झाली.तेंव्हा त्याच्या घरच्यांनी त्याला त्वरित नांदेड येथे खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले.दोन दिवस उपचार घेऊनही फरहानची प्रकृती सुधारली नाही.तेंव्हा त्याला अत्यवस्थ अवस्थेत पुढील उपचारासाठी औरंगाबाद येथिल घाटी शासकीय वैद्यकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.तेथेचं दि .२६ ऑक्टोबर रोजी रविवारी सायंकाळी ५:३० वा च्या सुमारास फरहानची प्राणज्योत मालवली.मयत फरहान हा वर्गातील सर्वात हुशार विद्यार्थी होता अशी माहिती




म.फुले विद्यालयातील शिक्षकांनी दिली. दि.२६ ऑक्टोबर रोजी रविवारी रात्री ११:३० वा च्या सुमारास फरहानचा दफनविधी वस्सा येथिल आडगावफाटा रस्त्यावरील कब्रस्तानात करण्यात आला.फरहानच्या मृत्यू बद्दल सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.फरहानचा मृत्यू डेंग्यू सदृश्य तापाने झाल्याने आरोग्य विभागाने वस्सा येथे सर्वेक्षण करून परिसरात डेंग्यू तापाची साथ तर सुरु नाही ना ? याचा शोध घेणे आवश्यक आहे.

# बीडमध्ये बुद्ध आणि त्यांचा धम्म समकालीन आकलनावर धम्म चर्चा

## उपस्थित राहण्याचे फुले-आंबेडकर विचार सभेचे आवाहन

बीड, (दिव्य न्युज):- समाज परिवर्तनाचे अधिष्ठान असलेल्या सम्यक बुद्धांच्या शिकवणीचा आधुनिक संदर्भातून आढावा घेण्यासाठी 'बुद्ध आणि त्यांचा धम्म : समकालीन आकलन' या विषयावर भव्य धम्म चर्चा आयोजित करण्यात आली आहे. ही चर्चा रविवार, दि. २ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता, हॉटेल निलकमल, बीड येथे पार पडणार आहे.



या धम्म चर्चेत डॉ. प्रकाश सिरसट आणि डॉ. उमेश बागडे हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून विचार मांडणार आहेत. कार्यक्रमाचे उदघाटन जिल्हा कृषी अधीक्षक सुभाष साळवे यांच्या हस्ते होणार असून, अध्यक्षस्थानी डॉ. विक्रम धन्वे राहणार आहेत.कार्यक्रमाचे प्रास्ताविक ॲड. राजेश शिंदे करतील, तर सूत्रसंचालन सुनिल डोंगरे करणार आहेत. फुले-आंबेडकर विचार सभेचे संयोजक वंचितचे माजी जिल्हाध्यक्ष अनिल डोंगरे, डॉ. बी. एन. जावळे आणि ॲड. तेजस वडमारे यांनी नागरिकांना आवाहन केले आहे की या अर्थपूर्ण व चिंतनपर धम्म चर्चेत सहभागी होऊन समाज परिवर्तनाच्या विचारप्रवाहाला बळ द्यावे.धम्म चर्चेचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी निमंत्रक रजनिकांत वाघमारे, प्रविण टाकणखार, युवराज जाधव, मल्हारी जाधव, सूरज निकाळजे, सुशीलकुमार उजगरे, संदिप सोनवणे, विक्रांत उजगरे, धनराज पारवे, आशिष जोगदंड, आकाश कोकाटे, चंदू काळे, वैभव धवन, मयूर कांबळे, प्रताप बनसोडे, अनिकेत वडमारे, सूरज वाघमारे, आदर्श सोनवणे, अमित कोरडे, अभय इंगोले, ऋषी उघडे, सारंग जावळे, मनोज शिंदे, सिध्दार्थ पवळे परिश्रम घेत आहेत.

# गालिब अकॅडमी, दिल्ली येथे बीडचे लईक सर सन्मानित

## नॅशनल उर्दू टीचर अवॉर्ड ने गौरव - शिक्षण क्षेत्राचा अभिमान!

बीड, (दिव्य न्युज):- दिल्लीतील नामांकित गालिब अकॅडमी येथे आयोजित भव्य कार्यक्रमात इंदिरा गांधी मेमोरियल उर्दू हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, बीड येथील प्राध्यापक लईक सर यांना नॅशनल उर्दू टीचर अवॉर्ड ने सन्मानित करण्यात आले.

हा पुरस्कार क्कामी उर्दू शिक्षक कर्मचारी संघ, बिहार यांच्या वतीने देण्यात आला असून, देशभरातील निवडक शिक्षकांमधून उत्कृष्ट कार्यासाठी लईक सर यांची निवड करण्यात आली. त्यांच्या शैक्षणिक योगदानाची आणि विद्यार्थ्यांप्रती असलेल्या समर्पणभावाची दखल घेत हा सन्मान प्रदान करण्यात आला.या गौरवप्रसंगी अनेक मान्यवरांनी लईक सर यांचे अभिनंदन केले.पीपल्स एज्युकेशन सोसायटी चे सचिव श्री. मुश्ताक अन्सारी साहेब, अध्यक्ष श्री. खलीद सलीम, न्यायाधीश श्री. ख्वाजा फारूक अहमद, सर सय्यद स्कूल चे सचिव वकील सर, तसेच इंदिरा गांधी मेमोरियल उर्दू हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज चे मुख्याध्यापक हामिद खान, सज्जाद सर, अतीक सर यांनी लईक सर यांचे मनःपूर्वक अभिनंदन करून त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

सन्मान स्वीकारताना लईक सर म्हणाले, हा पुरस्कार माझ्या विद्यार्थ्यांचा, सहकाऱ्यांचा आणि संपूर्ण शैक्षणिक परिवाराचा सन्मान आहे. उर्दू शिक्षणाच्या माध्यमातून समाजात सकारात्मक बदल घडवण्याचे माझे प्रयत्न पुढेही सुरू राहतील.या सन्मानामुळे बीड जिल्ह्याचा मान उंचावला असून, शिक्षकवर्ग व विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.





बीड :- माजी सभापती ईल्यास टेलर साहब यांची राष्ट्रीय कांग्रेस पार्टी बीड जिल्हा उपध्यक्ष पदी नियुक्ती पत्र देताना खा. रजनी ताई पाटील, माजी मंत्री अनिस अहेमद, माजी मंत्री अशोक पाटील, जिल्हा अध्यक्ष राहुल सोनवणे सह आदीं

# बीडमध्ये एक्सिस ऑर्थोपेडिक हॉस्पिटलतर्फे पोटविकार तज्ञांची सेवा उपलब्ध

## नागरिकांच्या आरोग्यासाठी विशेष उपक्रम

बीड, (दिव्य न्युज):- वाढत्या पोटविकारांच्या पार्श्वभूमीवर, बीडमधील एक्सिस ऑर्थोपेडिक हॉस्पिटलने नागरिकांच्या आरोग्यासाठी एक महत्वपूर्ण पाऊल उचलले आहे. या उपक्रमांतर्गत, प्रसिद्ध पोटविकार तज्ञ डॉ. अक्षय कुलकर्णी हे मंगळवार २८ ऑक्टोंबर २०२५ रोजी २ ते ४ वाजेपर्यंत हॉस्पिटलमध्ये रुग्णांसाठी उपलब्ध असतील.

या विशेष उपक्रमाचा उद्देश लवकर निदान, तात्काळ उपचार आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना यावर भर देऊन पोटविकारांवरील प्रभावी उपाय नागरिकांना उपलब्ध करून देणे हा आहे. रुग्णांनी तपासणीसाठी पूर्वनोंदणी करणे आवश्यक असून, यामध्ये तज्ञांकडून सल्ला, तपासणी आणि योग्य उपचार मार्गदर्शन मिळणार आहे.या उपक्रमाबाबत सैय्यद हसीब सरांचे एक्सिस ऑर्थोपेडिक हॉस्पिटल, माने पेट्रोल पंपाच्या मागे,नर्सरी रोड बीड तर्फे सर्व नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे की त्यांनी या संधीचा लाभ घ्यावा आणि आपल्या आरोग्याची काळजी घ्यावी. अधिक माहितीसाठी ९९२३०१०२०२ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क करावा.